सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाचे रोपट्यास पाणी घालून उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह विद्यापीठाचे प्रमुख अधिकारी.

# शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन अध्ययन व विस्तार केंद्रातर्फे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात योग दिन साजरा केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड आणि योग शिक्षक सूरज पाटील यांच्या हस्ते रोपट्यास पाणी वाहून उद्‌घाटन केले. प्रशिक्षक सूरज पाटील यांनी योग प्रात्यक्षिके सादर केली. शिवाजी विद्यापीठाने पहिल्या आंतरराष्ट्रीय योग दिनापासून विद्यापीठात दररोज सकाळी योग प्रशिक्षण शिबिर चालविले आहे. या शिबिराचा आठवा वर्धापन दिनही आज झाला. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित २९३ महाविद्यालयांमध्येही आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शिबिरात प्रात्यक्षिके करताना साधक.

# शिवाजी विद्यापीठात योग दिन उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी सकाळी ७ वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुद्देशीय सभागृहात आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते रोपट्यास पाणी वाहून योग दिन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रशिक्षक सूरज पाटील यांनी योग प्रात्यक्षिके सादर केली. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. अभय जायभाये, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते.

तरुण भारत

प्रतिनिधी
कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठात योग प्रात्यक्षिके

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा केला. योग प्रशिक्षक सूरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रात्यक्षिके सादर केली. योगा प्रात्यक्षिकात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड सहभागी झाले होते.

22 JUN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ठाकरे वाईल्डलाईफचे यश : अक्षय खांडेकर, तेजस ठाकरे, इशान अगरवाल यांचा समावेश

# कोल्हापूरच्या संशोधकाने शोधल्या तीन नव्या दुर्मीळ पाली

**संदीप आडनाईक**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ठाकरे वाईल्डलाईफ फाउंडेशनसाठी काम करणारे कोल्हापुरातील संशोधक अक्षय खांडेकर यांच्यासह तेजस ठाकरे आणि इशान अगरवाल (बंगळुरू) यांनी तामिळनाडू येथे नव्या तीन दुर्मीळ पालींचा शोध लावला आहे. या संशोधनामुळे पश्चिम घाटातील या प्रजातीची संख्या आता ४८ झाली आहे.

खांडेकर हे शिवाजी विद्यापीठात प्राणिशास्त्र विभागात पीएच.डी.चे विद्यार्थी आहेत. त्यांना सहायक संशोधक सतपाल गंगनमाळे यांनीही सहकार्य केले. तामिळनाडूतील मुंदनथुराई टायगर रिझर्व्हमध्ये आढळलेल्या या दुर्मीळ पाली निमॉस्पिस प्रजातीच्या असून, त्या प्रदेशनिष्ठ आहेत. 'निमॉस्पिस अळगू', 'निमॉस्पिस कलकडेनसीस' आणि 'निमॉस्पिस मुंदनथुराईएनसीस' असे त्यांचे नामकरण केले आहे. या प्रजातीच्या जगात १५०हून अधिक पाली आहेत.

शरीराचा रंग, खवल्यांची संख्या, इतर वैशिष्ट्ये आणि जनुकीय विश्लेषणाच्या आधारावर या पाली वेगळ्या असल्याचे तज्ज्ञांनी शिक्कामोर्तब केले.


'निमॉस्पीस अळगु

अळगू या तमिळ शब्दाचा अर्थ सुंदर असा आहे. त्यामुळे केवळ तिरुकुरुंगुडी राखीव जंगलात आढळणाऱ्या या पालीला 'निमॉस्पिस अळगू' असे नाव तिच्या सौंदर्यावरून ठेवले आहे. समुद्र सपाटीपासून २००-३०० मीटर उंचावरील शुष्क पानगळी जंगलातील दगडांवर ती आढळून येते. ही एक दिनचर पाल असून, छोट्या कीटकांवर जगते.



भारतात विशेषतः पश्चिम घाटात अजूनही नवीन प्रजातींचा शोध लागत असून, पाली, इतर सरपटणारे प्राणी तसेच पर्यावरणीय अभ्यासाच्या दृष्टीने काम करण्याची गरज आहे.

**-अक्षय खांडेकर,**
संशोधक, ठाकरे वाईल्डलाईफ फाउंडेशन

22 JUN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात मंगळवारी शहाजी लॉ कॉलेजच्या प्रांगणात देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थी, शिक्षकांतर्फे योगाची प्रात्यक्षिके करून जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. (छाया : नसीर अत्तार)

# अवघे कोल्हापूर बनले 'योग'मय

## आंतरराष्ट्रीय दिन : प्रात्यक्षिक, जनजागृती फेरी, विद्यार्थी, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पद्मासन, भुजंगासन, सूर्यनमस्कार, विरासन, नौकासन, मार्जारासन, अशी विविध आसनं करत आणि त्याची प्रात्यक्षिके पाहत कोल्हापूरकरांची मंगळवारची सुरुवात झाली. जागतिक योग दिनानिमित्त शाळा, महाविद्यालयांसह विविध सामाजिक संस्था, संघटनांनी योगाची माहिती देणारे मार्गदर्शन, प्रात्यक्षिकपर कार्यक्रम, जनजागृती फेरी घेतली. त्यात विविध वयोगटातील नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. अवघे कोल्हापूर 'योग'मय बनले.

### कॉमर्स कॉलेजतर्फे मानवी तिरंगा

जागतिक योगदिनानिमित्त देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉमर्स कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षकांनी योग प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शहाजी लॉ कॉलेजच्या प्रांगणात मानवी तिरंगा (राष्ट्रध्वज) करण्यात आला. सकाळी सात ते आठ यावेळेत योगतज्ज्ञ मनीषा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी योगाची प्रात्यक्षिके केली.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्रातर्फे सकाळी सव्वासात वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, आर. व्ही. गुरव, अभय जायभाये, ए. एम. गुरव, पी. टी. गायकवाड यांच्या हस्ते रोपट्यास पाणी वाहून योग दिन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रशिक्षक सूरज पाटील यांनी योग प्रात्यक्षिके सादर केली. विद्यापीठाशी संलग्नित २९३ महाविद्यालयांमध्ये योग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले. डी. वाय. पाटील विद्यानिकेतनमध्ये रवींद्र ताम्हणकर, नॅशनल गोल्ड मेडल लिस्ट अमृता पोवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक रूपाने योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

पुढारी

# ‘करिअरच्या संधी’वर विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ इंग्रजी अधिविभाग व केंद्रीय प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने इंग्रजी पदवीधरांसाठी ‘करिअरच्या संधी’ या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा नुकतीच झाली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. कार्यशाळेत जीएसटी उपायुक्त तेजस्विनी मोरे, रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रा. अनिल घुले, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, भारतीय वायुसेनेचे ग्रुप कॅप्टन श्रीकांत बी. वालवडकर, आयईएलटीएस व टोफेल प्रशिक्षक व्हॅलेंटिना सोहेली यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी प्लेसमेंट ऑफिसर प्रमोद समुद्रे, प्रा. सी. ए. लंगरे आदी उपस्थित होते. प्रा. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. दीपक भादले यांनी आभार मानले.

पुढारी

# तृतीयपंथीयांसाठी उद्या शिबिर

**कोल्हापूर :** तृतीयपंथीयांच्या हक्काचे संरक्षण व कल्याण या विषयावर गुरुवारी (दि. २३) एकदिवसीय शिबिराचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सकाळी १० वाजता या शिबिराला प्रारंभ होणार आहे. शिबिरात राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्त्या तृतीयपंथी गौरी सावंत मार्गदर्शन करणार आहेत. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रीतम पाटील यांचे तृतीयपंथी यांच्याबाबतचे कायदेविषयक मार्गदर्शन व तृतीयपंथीयांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील तृतीयपंथीयांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे.

तरुण भारत

# तृतीयपंथीयांसाठी उद्या शिबिर

**कोल्हापूर :** तृतीयपंथीय यांच्या हक्काचे संरक्षण व कल्याणासाठी उद्या, गुरुवारी सकाळी १० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषाभवन येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे उद्‌घाटन पालकमंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते होणार असून प्रमुख उपस्थिती जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांची राहणार आहे. शिबिरामध्ये राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्त्या तृतीयपंथी गौरी सावंत व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रीतम पाटील यांचे तृतीयपंथी यांच्याबाबतची कायदेविषयक मार्गदर्शन होणार आहे. त्याचबरोबर तृतीयपंथीयांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याचा जिल्हयातील तृतीयपंथीयांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे.